N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म -

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** क्रांति चौक **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0168 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 15/05/2019 19:37 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ (सुधारित 2018) | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Date From (दिनांक पासून):** 15/05/2019
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/05/2019
   **Time From (वेळेपासून):** 12:35 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 12:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 15/05/2019 **Time (वेळ):** 18:55 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 033 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/05/2019 18:55 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 03 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** श्रीमती अंबाडेकर समाजकल्याण,अधिकारी जि प कक्ष ,औरंगाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शहेनाज पिता इब्राहीम खान
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**
(c) **Date/Year of Birth (जन्म** 1969 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**
(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मोमीन आरेफ कॉलनी,अब्दीमंडी, दौलताबाद ,औरंगाबाद,दौलताबाद पोलीस स्टेशन,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मोमीन आरेफ कॉलनी,अब्दीमंडी, दौलताबाद ,औरंगाबाद,दौलताबाद पोलीस स्टेशन,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मिना अशोक अंबाडेकर | | | 1. सावरकरनगर पुरोहित यांचेघरात, चिश्तीया कॉलनी एन06 सिडको , औरंगाबाद ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |
| 2 | शेख मोहमद हनिफ शेख इब्राहिम | | | 1. बेरीबाग हर्सुल,औरंगाबाद ,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

दिनांक 15 /05/2019.मी शहेनाज पिता इब्राहीम खान, वय 50 वर्ष, व्यवसाय नोकरी, शासकिय प्रौढ अपंगाचे प्रशिक्षण केंद्र, सिडको, एन-11, औरंगाबाद, मुळ रा. मोमीन आरेफ कॉलनी, अब्दीमंडी, दौलताबाद, ता. जि.औरंगाबाद.मी वरील ठिकाणची राहणारी असुन मी जिल्हा परिषद समाज कल्याण अंतर्गत शासकीय प्रौढ अंपगाचे प्रशिक्षण केंद्र एन-11 औरंगाबाद येथे मदतनीस या पदावर नोकरीस आहे.मला रजेची आवश्यकता असल्याने मा.अधिक्षक, शासकीय प्रौढ अंपगाचे प्रशिक्षण केंद्र एन-11 औरंगाबाद यांचेकडे अर्ज करुन दि. 05/12/2018 ते दि. 31/12/2018 तसेच दि. 16/01/2019 ते दि. 31/01/2019 या कालावधीत एकुण 42 दिवस अर्जित रजा भोगली होती. त्यानंतर अर्जित रजा मंजुर करुन घेणे आवश्यक असल्याने मी अधीक्षक, शासकीय प्रौढ अंपगाचे प्रशिक्षण केंद्र एन-11 औरंगाबाद यांचेकडे अर्ज करुन त्यांचे मार्फतीने फेब्रुवारी 2019 मध्ये प्रस्ताव जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेकडे पाठविला होता. त्यानंतर वेळोवेळी मी समाजकल्याण विभागात येवुन चौकशी केली परंतु माझी अर्जित रजा मंजुर झालेली नाही म्हणुन मी जि.प.औरंगाबाद येथील अस्थापना विभागील संबंधीत लिपीक यांचेकडे जावुन चौकशी केली असता मला समजले की, माझ्या अर्जित रजा मंजुरीचे आदेश तयार असुन आदेशावर स्वाक्षरीसाठी श्रीमती मिना अंबाडेकर, समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचे टेबलावर ठेवले आहेत. परंतु समाज कल्याण अधिकारी यांनी अद्याप पावेतो माझ्या अर्जित रजा मंजुरी बाबतच्या आदेशावर स्वाक्षरी केलेली नाही. त्यामुळे मी दि.13/05/2019 रोजी समाज कल्याण अधिकारी श्रीमती मिना अंबाडेकर यांची भेट घेऊन माझ्या अर्जित रजा मंजुरी बाबत विचारपुस केली असता त्या मला म्हणाल्या की, तुमची अर्जित रजा मंजुरी बाबतची फाईल मी पाहिली आहे. परंतु अद्याप पावेतो त्यावर मी सही केलेली नाही. तुम्ही एकाच वेळी दोन वर्षाची अर्जित रजा मंजुरी बाबत अर्ज केला आहे. मी तुमची रजा मंजुर करते पण त्यासाठी तुम्हाला 5,000/- रुपये खर्च येईल. त्यावर मी श्रीमती अंबाडेकर मॅडम यांना म्हणाले की, मॅडम माझी अर्जित रजा मंजुर करा. त्यावर श्रीमती अंबाडेकर मॅडम मला म्हणाल्या की, तुम्ही उद्या पाच हजार रुपये घेवुन या व तुमची अर्जित रजा मंजुरीचे आदेश घेवुन जा. त्यावर मी नाईलाजाने त्यांना हो म्हणुन निघुन आले आहे. मी दिनांक 05/12/2018 ते दि. 31/12/2018 तसेच दि. 16/01/2019 ते दि. 31/01/2019 या कालावधीत एकुण 42 दिवस अर्जित रजा भोगली होती. त्या 42 दिवसाची अर्जित रजा मंजुर करणे कामी समाज कल्याण अधिकारी श्रीमती अंबाडेकर मॅडम यांचे कडे अर्जित रजा मंजुर



Scanned by CamScanner

करणे बाबत प्रस्ताव सादर केला असता अंबाडेकर मॅडम यांनी माझी अर्जित रजा मंजुर करण्या करिता माझ्या कडे लाचेची मागणी केली आहे. परंतु माझी श्रीमती अंबाडेकर यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.14/05/2019 रोजी 11.00 वाजेच्या सुमारास ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय औरंगाबाद येथे प्रत्यक्ष जावुन पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे यांना भेटले. त्यांना मी माझा तक्रार अर्ज दाखवीला. पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे यांनी लागलीच ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय औरंगाबाद येथे गोपनीय कामासाठी हजर असलेले दोन शासकीय पंच 1) श्रीमती नंदा श्रीराम शिंदे, व्यवसाय नौकरी, शिपाई, अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय, राष्ट्रीय महामार्ग मंडळ, औरंगाबाद, व 2) सतीश अशोक जाधव, वय 28 वर्षे, व्यवसाय नौकरी, लिपीक टंकलेखक, महानगरपालीका, वर्ड क्र.1 औरंगाबाद, यांना त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन त्यांना माझी ओळख करुन देवुन माझा तक्रार अर्ज दाखवीला तो त्यांनी वाचुन पाहिला. त्यानंतर माझे तक्रार अर्जावर पंचानी सहया केल्या व पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे यांनी समक्ष म्हणुन सही केली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे यांनी माझ्या व दोन्ही पंचाच्या संमतीने प्रस्तुत प्रकरणात पंचा समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेवुन सदर कारवाई दरम्यान व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन एक सोनी कंपनीचा व्हईस रेकॉर्डर त्यांचे कपाटातुन काढुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले. तसेच सदर व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरी कार्ड मध्ये संभाषण ध्वनीमुद्रीत होत असल्याचे सांगुन त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकले तसेच सदर मेमरी कार्ड मध्ये अगोदरचे कोणतेही संभाषण नसल्याची मला व दोन्ही पंचाना खात्री करुन देण्यात आली. त्यानंतर सापळा पथकातील कर्मचारी यांना त्यांचे कक्षात बोलावुन घेवुन त्यांची मला ओळख करुन देण्यात आली. लाचमागणी पडताळणी कारवाईस अनुसरुन आवश्यक त्या सुचना मला, पंच क्र. 1 श्री. नंदा शिंदे व सापळा पथकातील कर्मचारी याना करुन देण्यात आला.त्यानंतर सापळा पथकातील कर्मचारी श्री. जीवडे यांनी त्यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन माझे जवळ दिल्याने तो मी माझ्या अंगावरील कपडयामध्ये कोणासही दिसणार नाही अशा रितीने ठेवला. त्यानंतर मी व पंच क्र. 1 श्रीमती नंदा शिंदे असे माझ्या मोपेडने समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद, औरंगाबाद येथे जावुन श्रीमती अंबाडेकर मॅडम यांची पंच श्रीमती नंदा शिंदे यांचे समक्ष भेट घेतली असता त्यावेळी श्रीमती अंबाडेकर मॅडम व माझ्या मध्ये माझे कामा संबंधात चर्चा झाली व माझी 42 दिवस अर्जित रजा मंजुर करण्यासाठी श्रीमती मिना अंबाडेकर मॅडम यांनी त्यांचे टेबलावरील डायरीत 5 असा आकडा लिहीला, त्यावर मी त्यांना म्हणाले पाचशे का त्यावर श्रीमती मिना अंबाडेकर मॅडम यांनी पुन्हा त्याच डायरीवरील 5 या अंकावर तीन शुन्य लिहीले व हानिफ यांचे कडे देण्याचे सांगीतले.त्यानंतर मी व पंच क्र.1 श्रीमती नंदा शिंदे असे माझे मोपेडवर बसुन जिल्हा परिषद, औरंगाबाद येथुन निघुन ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, औरंगाबाद येथे आलो. तेथे श्री. जीवडे यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन त्यामध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांनी एैकले त्यामध्ये श्रीमती अंबाडेकर मॅडम जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.त्यानंतर श्रीमती अंबाडेकर, समाजकल्याण अधिकारी यांनी लाचेची मागणी लिहुन केलेली असल्याने पुन्हा एकदा श्रीमती अंबाडेकर यांची भेट घेवुन लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय दोन्ही पंच व माझ्या संमतीने पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे यांनी घेतला. त्याप्रमाणे पुन्हा पडताळणी साठी मी व पंच क्रमांक 1 श्रीमती नंदा शिंदे यांना व्हाईस रेकर्डर घेऊन समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद येथे गेले असता तेथे पंच क्रमांक 1 यांचे समक्ष श्रीमती अंबाडेकर मडम, समाज कल्याण अधिकारी यांची भेट घेऊन मॅडम पाच हजार रुपये जास्त होतात त्यात काही कमी करता या बाबत मी बोलले असता श्रीमती अंबाडेकर मडम म्हणाल्या ठिक आहे. तुम्ही जा आता असे बोलणे झाले.त्यानंतर मी व पंच क्र.1 श्रीमती नंदा शिंदे असे माझे मोपेडवर बसुन जिल्हा परिषद, औरंगाबाद येथुन निघुन ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, औरंगाबाद येथे आलो. तेथे श्री. जीवडे यांनी माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर काढुन घेवुन त्यामध्ये रेकर्ड झालेले संभाषण पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे, दोन्ही पंच व सापळा पथकातील कर्मचारी यांनी एैकले. वरील सर्व घटनाक्रमा वरुन श्रीमती अंबाडेकर, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी माझी अर्जित रजा मंजुर करण्यासाठी 5,000/- रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम श्री. हनिफ, लिपीक, समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेकडे देण्याचे सांगीतले असल्याचे निष्पन्न होत असल्याने व कार्यालयीन वेळ संपलेली असल्याने दि. 15/05/2019 रोजी श्री. हनिफ, लिपीक यांचे विरुध्द लाचेचा सापळा आजामाविण्या बाबतचा निर्णय पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे यांनी माझ्या व दोन्ही पंच कर्मचारी यांचे संमतीने घेतला होता.त्याप्रमाणे आज दिनांक 15/05/2019 रोजी ऍन्टी करप्शन ब्युरो औरंगाबाद येथील कार्यालयात हजर आले त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे यांचे सुचनेवरुन मी माझ्या अंगावरील सर्व साहित्य टेबलावर काढुन ठेवले. त्यामधील लाचेच्या रक्कमे करीता आवश्यक असणारे पाचशे रुपये दराच्या 10 चलनी नोटा असे एकुण 5000/- रुपये त्यांनी काढुन घेवुन उर्वरीत साहित्य व रोख रक्कम मला परत केली. त्यानंतर त्यांनी मला व दोन्ही पंच यांना ऍंथ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्याचे प्रात्यक्षीक करुन दाखवीले व सापळा कारवाईसाठी आवश्यक त्या सुचना दिल्या तसेच श्री. हनिफ, लिपीक किंवा श्रीमती अंबाडेकर मडम, जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांनी लाचेची रक्कम स्विकारल्या नंतर माझे गळ्यातील स्कार्प काढुन डावे हातात धरावा व वर-खाली या प्रमाणे हलवुन सापळा पथकातील सदस्यांना दिसेल असा लाचेची रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याची सुचना दिली. त्यानंतर ऍंथ्रासीन पावडर लावलेल्या लाचेच्या नोटा माझ्या पर्स मध्ये ठेवल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर माझ्याकडे दिला, तो मी माझे अंगातील कपडयामध्ये कोणासही दिसणार नाही अशा रितीने ठेवला. त्यानंतर मी व पंच श्रीमती नंदा शिंदे असे माझे मोपेडने तर पोलीस उप अधीक्षक श्री. सुजय घाटगे व सापळा पथकातील काही कर्मचारी असे शासकीय वाहनात बसुन तर काही त्यांचे खाजगी मोटारसायकलवर बसुन ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय औरंगाबाद येथुन निघुन समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद येथे आलो. तेथे प्रथम मी श्री. हनिफ, लिपीक यांची भेट घेवुन त्यांचेशी माझ्या कामा बाबत चर्चा केली. त्यावेळी श्री. हनिफ, लिपीक यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्याने मी लाचेची रक्कम काढुन त्यांचे समोर धरली असता श्री. हनिफ यांनी लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन दोन्ही हातांनी मोजुन त्यांचे अंगातील शर्टचे छातीवरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवली. त्यानंतर एक आयताकृती कागद काढुन त्यामध्ये माझ्याकडुन घेतलेली लाचेची रक्कम गुंडाळुन श्रीमती अंबाडेकर यांचे कक्षात गेले. श्री. हनिफ व श्रीमती अंबाडेकर मडम यांचे हळु आवाजात बोलणे झाले त्यावेळी श्रीमती अंबाडेकर मडम यांनी त्यांचे खुर्चीचे समोरील टेबलाचा वरचा ड्रवर त्यांचे हाताने उघडला असता श्री. हनिफ यांनी माझ्याकडुन स्विकारलेली लाचेची रक्कम सदर ड्रवर मध्ये ठेवली. वरील सर्व घटना घडत असतांना मी व पंच क्र. 1 श्रीमती नंदा शिंदे अशा श्रीमती अंबाडेकर मडम यांचे कक्षाचे दरवाजातच उभे होतो. त्यानंतर मी समाजकल्याण विभागाचे दर्शनी भागात येवुन सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. ती वेळ सुमारे 12.35 वाजेची होती.त्यानंतर तात्काळ सापळा पथकाने श्रीमती अंबाडेकर, जिल्हा समाज कल्याण अधिकारी व लिपीक हानिफ याना पकडुन त्यांचेकडुन लाचेची रक्कम जप्त केली असुन त्यांचे हाताची व अंगातील कपडयाची अल्ट्राव्हयेलेट लम्पच्या प्रकाशात तपासणी केली असता श्री हानिफ, लिपीक यांचे दोन्ही हाताचे दहाही बोटांचे पे-यावर तसेच त्यांचे अंगातील शर्टचे समोरील डावे बाजुचे खिशाचे तोंडावर व आतमध्ये ठिकठिकाणी ऍंथ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली आहे. तसेच त्यानंतर माझ्या हातांची तपासणी केली असता माझ्या उजव्या हाताच्या बोटांचे पे-यावर तसेच माझ्याकडील लेडीजपर्सचे एका कप्प्याचे तोंडावर व आतमध्ये ऍंथ्रासीन पावडरची हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली आहे. त्यानंतर माझ्या कामा संबंधीची पेपर समाज कल्याण विभागातील आवक जावक विभागातील कर्मचारी श्री कैलास मोरे, लिपीक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांचेकडुन ताब्यात घेण्यात आले आहेत. त्यानंतर सापळा कारवाईचे पंचनामे करण्याकरीता ऍन्टी करप्शन ब्युरो कार्यालय औरंगाबाद



Scanned by CamScanner

येथे परत आलो. अशा प्रकारे श्रीमती अंबाडेकर मडम, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, व हानिफ, लिपीक समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी माझी 42 दिवसाची अर्जित रजा मंजुर करण्यासाठी 5000/- रुपये लाचेची पंच साक्षीदारा समक्ष शब्दसंख्या अधिक असल्याने पान नं 4 फियादि स्कॅन करुन सोबत जोडले आहे

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): UTTAM DADARAO MULAK(I (Inspector)) / POBN55887 **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): UTTAM DADARAO MULAK
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN55887

पोलीस ठाणे ... औरंगाबाद (श)



Scanned by CamScanner